MHWS040005042019

दाखल तारीख :— २४/०५/२०१९
नोंदणी तारीख :— २४/०५/२०१९
निकाल तारीख :— १६/०३/२०२६
कालावधी :— ०६ वर्ष ९ म २२ दि

**भाग 'अ'**

| | |
|---|---|
| **<u>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगरुळपीर, जि. वाशिम यांचे न्यायालयात</u>**<br>**<u>(पिठासिन अधिकारी सुभाष द. तारे)</u>** | |
| **संक्षिप्त फौजदारी खटला क्रं. २३०/२०१९ निशाणी क्र. ८२**<br>**(वॉरंट खटल्याची संपरिक्षा अवलंबिण्यात आली)** | |
| गुन्हा नोंद क्र. व पोलीस ठाणे | गुन्हा नोंद क्र. ४२२/२०१८<br>पोलीस ठाणे मंगरुळपीर. |
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस ठाणे अंमलदार, पोलीस ठाणे मंगरुळपीर, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम. |
| प्रतिनिधीत्व | सहा. सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. डी. आरु. |
| आरोपी | १. हिरालाल ज्ञानेश्वर जांभूळकर<br>वय ४३ वर्षे, धंदा:— नोकरी,<br>रा. शहापुर, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम.<br>२. गोपाल नारायण पिंपळकर<br>वय ५८ वर्षे, धंदा:— नोकरी,<br>रा. वार्ड क्र. ३ मंगरुळपीर,<br>ता. मंगरुळपीर, जि. वाशिम. |
| प्रतिनिधित्व | वकील :— एन. एम. मुळे |

**भाग 'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | १५/११/२०१८ |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंदविल्याची तारीख | १९/११/२०१८ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | २४/०५/२०१९ |
| आरोपींविरूध्द दोषारोप निश्चित केल्याची तारीख | २४/०५/२०१९ |
| पुरावा नोंदविण्यास ठेवलेली प्रथम तारीख | ०४/०७/२०१९ |

| | |
|---|---|
| पुरावा बंद केल्याची तारीख | ०८/१०/२०२५ |
| युक्तीवाद ऐकल्याची तारीख | ०२/०२/२०२६ व १६/०३/२०२६ |
| निकालाची तारीख | १६/०३/२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | संबंधित नाही |

आरोपींबाबत तपशिल

| अ.क्र. | आरोपींचे नावे | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ प्रमाणे संपरिक्षे दरम्यान निरूध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | हिरालाल ज्ञानेश्वर जांभूळकर | अटक नाही | २४/०५/२०१९ | कलम ३३७, ३३८ ३०४–अ भा.दं.वि. | निर्दोष मुक्त | लागु नाही | —— |
| २ | गोपाल नारायण पिंपळकर | | | | | | |

## **भाग ‘क’**

फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४

अ. साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्रमांक | निशाणी क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप/ साक्षीदाराची भुमिका |
|---|---|---|---|
| १ | २० | प्रमोद दत्ताराम पाकधने | घटनास्थळ व जप्ती पंच साक्षीदार |
| २ | २७ | सुशिला मनोज भोयर | साक्षीदार |
| ३ | २८ | विष्णु कुंडलीक चौधरी | घटनास्थळ व जप्ती पंच साक्षीदार |
| ४ | ३२ | नरेश रमेश भोयर | साक्षीदार |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | ३३ | निलेश शांताराम भोयर | साक्षीदार |
| ६ | ४० | दिगांबर भिमराव भोयर | साक्षीदार |
| ७ | ४१ | सुनिल विठठल भोयर | साक्षीदार |
| ८ | ४२ | अनिता सुनिल भोयर | साक्षीदार |
| ९ | ६० | शुभम भाउराव कांबळे | साक्षीदार |
| १० | ६१ | भास्कर रामदास कोहचळे | साक्षीदार |
| ११ | ६४ | अरविंद उत्तमराव सोनोने | तपासीक अमलदार |

ब. बचावपक्षाचे साक्षीदार — निरंक

क. अभियोगपक्षाच्या/बचावपक्षाच्या कागदपत्रांच्या निशाणींची यादी —

| दस्त क्रमांक | निशाणी | दस्ताचे स्वरूप |
|---|---|---|
| १ | २९ | घटनास्थळ पंचनामा |
| २ | ३० | जप्ती पंचनामा |
| ३ | ६५ | दि.१६.११.२०१८ रोजीचा नरेश भोयर यांचा अर्ज |
| ४ | ६६ | दि.१६.११.२०१८ रोजी वैद्यकीय अधिकारी यांनी श्रीराम हॉस्पीटल यांना दिलेले पत्र |
| ५ | ६७ | मयत ज्ञानेश्वरी हिचा मृत्यूपूर्व जबाब |
| ६ | ६८ | दि.२०.११.२०१८ रोजी कार्यकारी अभियंता, महाराष्ट् राज्य विद्यूत पारेशन कंपनी यांना दिलेले पत्र |
| ७ | ६९ | दि.१०.०१.२०१९ रोजी कार्यकारी अभियंता, महाराष्ट् राज्य विद्यूत पारेशन कंपनी यांना दिलेले पत्र |
| ८ | ७० | दि.१.०१.२०१९ रोजीच्या पत्रावरुन कार्यकारी अभियंता, महाराष्ट् राज्य विद्यूत पारेशन कंपनी यांनी कळविलेला मजकुर |

बचावपक्षाने कबुल केलेल्या दस्तांची यादी —

| दस्त क्रमांक | निशाणी | दस्ताचे स्वरूप |
|---|---|---|
| १ | ७२ | इनक्वेस्ट पंचनामा |

| | | |
|---|---|---|
| २ | ७३ | महावितरण मंगरुळपीर यांचे दि. २२.११.२०१८ रोजीचे पत्र |
| ३ | ७४ | मरनोत्तर पंचनामा |
| ४ | ७५ | शवविच्छेदन अहवाल |
| ५ | ७६ | शवविच्छेदन अहवाल |

जप्त केलेल्या वस्तुंची यादी —

| अ.क्र. | जप्त वस्तु | आर्टीकल |
|---|---|---|
| १ | विजेचा तारेचा तुकडा | अ |
| २ | जळालेल्या कपडयाचे तुकडे | ब |

## न्यायनिर्णय
## (पारित दिनांक १६/०३/२०२६)

**१.** अभियोगपक्षाची थोडक्यात हकीगत अशी की, दिनांक १५/११/२०१८ रोजी फिर्यादी मनोज विठ्ठलराव भोयर हे सकाळी शेतात मजुरीच्या कामाने गेले होते. त्यांच्या घरी त्यांची पत्नी व मुले होती. ते शेतात असतांना सायंकाळी ५.०० वाजेच्या सुमारास निलेश शांताराम भोयर यांनी त्यांना फोन केला व गावठाण जवळील डि.पी. वरील तार तुटुन त्यांची मुलगी ज्ञानेश्वरी व त्यांच्या मोठ्या भावाची मुलगी श्रेया यांच्या अंगावर पडल्याचे व त्या जळाल्याचे सांगितले. तसेच त्या दोघींना मंगरुळपीर येथे सरकारी दवाखान्यात गावातील लोकांनी नेल्याचे त्यांना सांगितले. त्यानंतर फिर्यादी हे सरकारी दवाखान्यात गेले असता त्यांची मुलगी ज्ञानेश्वरी हिच्या हृदयाजवळ, पाठीवर, पायाला, हाताला जळाल्याच्या जखमा दिसल्या. तसेच श्रेया सुनिल भोयर हिच्या दोन्ही हाताला, मानेला, पाठीला, मांडीला जळाल्याच्या जखमा होत्या. तेथील वैद्यकिय अधिकारी यांनी प्राथमीक उपचार करुन पुढील उपचाराकरिता अकोला येथे नेण्यास सांगितल्यामुळे त्यांनी मुलींना अकोला येथील दवाखान्यात भरती केले. त्याठिकाणी उपचार चालु असतांना दिनांक १६/११/२०१८ रोजी रात्री २१.३० वाजता ज्ञानेश्वरी हिचा मृत्यु झाला. दिनांक १५/११/२०१८ रोजी फिर्यादीची मुलगी ज्ञानेश्वरी व गोपी आणि

त्यांच्या मोठ्या भावाची मुलगी श्रेया या त्यांच्या पत्नीला सांगुन सायंकाळी ५.०० वाजेच्या सुमारास नरेश याच्या गोठ्यावर जनावरांना वैरण टाकण्यासाठी व संडासकरिता गेल्या होत्या. त्या परत येत असतांना गोपी त्यांच्या पुढे आली. त्यांच्या पाठीमागुन ज्ञानेश्वरी व श्रेया या रस्त्याने चालत येत असतांना डि.पी. चा मेन लाईनचा जिवंत तार तुटुन ज्ञानेश्वरी व श्रेया यांच्या अंगावर पडला व त्यामध्ये त्या जळाल्यामुळे गंभीर जखमी झाल्या. त्यांना गावातील विष्णु पुंडलीक चौधरी, प्रमोद दत्ताराव पाकधने, निलेश शांताराम भोयर यांनी वाचविले व सरकारी दवाखाना मंगरुळपीर येथे भर्ती केले. त्यांच्या गावातील गावक—यांनी शेलगाव रुरल सेंक्टर क्र. १ खेडे विभाग १ विद्युत पारेषन कंपनी मंगरुळपीर येथे लाईनमन, सहाय्यक अभियंता, उपकार्यकारी अभियंता यांना गावातील डिपी वरील तारामध्ये स्पार्कींग होत असल्याचे व त्याचे काम करुन घेण्याचे सांगीतले होते, परंतु त्यांनी दखल घेतली नाही. विद्युत कंपनीचे लाईनमन, सहाय्यक अभियंता, उपकार्यकारी अभियंता यांच्या हलगर्जीपणामुळे व निष्काळजीपणामुळे डिपीला जोडणारा मेन लाईनचा जिवंत तार तुटला आणि श्रेया व ज्ञानेश्वरी यांच्या अंगावर पडला. त्यामुळे ते सर्वजण ज्ञानेश्वरी हिच्या मृत्यूस व श्रेया हिच्या गंभिर दुखापतीस कारणीभूत आहेत.

२. दिनांक १९.११.२०१८ रोजी पोलीस ठाणे मंगरुळपीर येथे दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा नोंद क्र. ४२२/२०१८ हा भा.दं.वि.चे कलम ३३७, ३३८, ३०४—अ अन्वये नोंद करून तपास नायक पोलीस कॉन्स्टेबल श्री अरविंद सोनोने ब.क्र. ६४३ यांच्याकडे सोपविण्यात आला.

**३.** तपासीक अंमलदार यांनी तपास पुर्ण करुन आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३३७, ३३८, ३०४—अ अन्वये गुन्हा केल्याबद्दल दोषारोपपत्र पाठविले.

४. माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी आरोपींविरूध्द निशाणी १२ कडे भा.दं.वि चे कलम ३०४—अ, ३३७, ३३८ अन्वये गुन्हा केल्याबाबत दोषारोप निश्चित केला आहे. आरोपींना त्यातील मजकूर वाचुन व समजावून सांगण्यात

आला. त्यांनी गुन्हा कबुल केला नाही व संपरिक्षेची मागणी केली.

**५.** आरोपींविरुध्द गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने भाग – क मध्ये नमुद केल्याप्रमाणे एकुण ११ साक्षीदार तपासले आहेत. आरोपींतर्फे मरणोत्तर पंचनामा, शवविच्छेदन अहवाल इत्यादी कागदपत्र मान्य करण्यात आलेले आहेत. अभियोगपक्षास वेळोवेळी संधी देवूनही इतर साक्षीदारांना हजर ठेवण्यात अभियोगपक्ष अपयशी ठरल्यामुळे दिनांक ०८.१०.२०२५ रोजीच्या निशाणी ०१ कडील आदेशाप्रमाणे अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**६.** आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये निवेदन अनुक्रमे निशाणी क्र. ७७ व ७८ कडे नोंदविले आहे. आरोपींनी त्यांच्या बचावाप्रित्यर्थ कोणताही साक्षीदार तपासला नाही. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांचा आरोपींच्या वतीने घेण्यात आलेला उलटतपास व आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये निवेदन यावरून खोटी केस केल्याचा बचाव त्यांनी घेतला असल्याचे दिसून येते.

**७.** सहाय्यक सरकारी विधिज्ञ व आरोपींचे विद्वान विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील आलेल्या पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर व उभय वकीलांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष यानंतर नमुद केलेल्या कारणांमुळे नोंदविले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | आरोपी क्र.१ हा उपकार्यकारी अभियंता व आरोपी क्र.२ हा तंत्रज्ञ म्हणून विज वितरण कंपणीमध्ये कार्यरत असताना, समान उददेशाने व एकत्रीतपणे त्यांनी त्यांच्या कर्तव्यात आवश्यक ते काळजी न घेता निष्काळजीपणा व हलगर्जीपणा केला, त्यामुळे विजेचा तार तुटून तो मयत ज्ञानेश्वरी व मयत श्रेया यांच्या अंगावर पडून त्यांना किरकोळ दुखापती होण्यास आरोपी कारणीभूत झाल्याचे आणि त्याद्वारे त्यांनी भारतीय दंड संहिताचे कलम ३३७ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| २ | आरोपी क्र.१ हा उपकार्यकारी अभियंता व आरोपी क्र.२ हा तंत्रज्ञ म्हणून विज वितरण कंपणीमध्ये कार्यरत असताना, समान उददेशाने व एकत्रीतपणे त्यांनी त्यांच्या कर्तव्यात आवश्यक ते काळजी न घेता निष्काळजीपणा व हलगर्जीपणा केला, त्यामुळे विजेचा तार तुटून तो मयत ज्ञानेश्वरी व मयत श्रेया यांच्या अंगावर पडून त्यांना जबर दुखापती होण्यास आरोपी कारणीभूत झाल्याचे आणि त्याद्वारे त्यांनी भारतीय दंड संहिताचे कलम ३३८ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| ३ | आरोपी क्र.१ हा उपकार्यकारी अभियंता व आरोपी क्र.२ हा तंत्रज्ञ म्हणून विज वितरण कंपणीमध्ये कार्यरत असताना, समान उददेशाने व एकत्रीतपणे त्यांनी त्यांच्या कर्तव्यात आवश्यक ते काळजी न घेता निष्काळजीपणा व हलगर्जीपणा केला, त्यामुळे विजेचा तार तुटून तो मयत ज्ञानेश्वरी व मयत श्रेया यांच्या अंगावर पडून त्यांच्या मृत्यूस आरोपी कारणीभूत झाल्याचे आणि त्याद्वारे त्यांनी भारतीय दंड संहिताचे कलम ३३७ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| ४ | काय आदेश ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. ०१ ते ०३ बाबत**

८. उपरोक्त सर्व मुद्‌दे एकाच घटनेशी निगडीत असल्याकारणाने पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व मुद्‌दे एकत्रितरित्या विचारात घेण्यात येत आहेत.

९. आरोपींनी त्यांच्या कामात हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे डि.पी.वरील विजेची तार तुटून मयत ज्ञानेश्वरी व श्रेया यांच्या अंगावर पडल्याचे आणि त्यामुळे त्यांना किरकोळ व जबर दुखापती होवून त्यांच्या मृत्यूस आरोपी कारणीभूत झाल्याचे अभियोगपक्षाचे कथन आहे. आरोपींवरील दोषारोप सर्व शंकेपलीकडे सिद्ध करण्याची जबाबदारी अभियोगपक्षाची आहे. त्यामुळे अभिलेखावर आलेला पुरावा पाहावा लागेल.

**१०.** साक्षीदार क्र. ०२ सुशिला ही मयत ज्ञानेश्वरी हिची आई व फिर्यादी मनोज भोयर याची पत्नी आहे. तिच्या पुराव्यात असे आले आहे की, घटना दिनांक १५/११/२०१८ रोजी संध्याकाळी ५.३० ते ६.०० वाजता घडली होती. त्यावेळी मयत श्रेया, ज्ञानेश्वरी या त्यांच्या दिराच्या गोठ्यावर खेळण्याकरिता व जनावरांना वैरण टाकण्याकरिता गेल्या होत्या. तेथुन परत येत असतांना ज्ञानेश्वरी व श्रेया यांच्या अंगावर विजेचा तार पडला. घटनेच्या वेळी त्या घरी होत्या व त्यांचे पती शेतात होते. गावातील लोकांनी त्यांच्या अंगावरील तार काढला. त्या घटनास्थळी गेल्या त्यावेळी ज्ञानेश्वरी हिचे संपुर्ण शरीर जळाले होते व श्रेया हिचा हात आणि डोक्याचा भाग जळालेला होता. त्यानंतर गावातील लोकांनी त्यांना दवाखान्यात नेले. उपचारादरम्यान श्रेया व ज्ञानेश्वरी यांचा मृत्यु झाला.

**११.** साक्षीदार क्र. ०४ नरेश व साक्षीदार क्र. ०५ निलेश हे दोघे मयत श्रेया व ज्ञानेश्वरी यांचे चुलत भाउ आहेत. त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, घटनेच्या वेळी मयत ज्ञानेश्वरी व श्रेया गुरांच्या गोठ्यावर गेल्या होत्या. त्या परत येत असतांना डि.पी. वर स्पार्कींग होवुन तार तुटला व त्यांच्या अंगावर पडला आणि त्यामध्ये त्या जळाल्या. तसेच उपचारादरम्यान त्यांचा मृत्यु झाला. साक्षीदार क्र. ०६ दिगांबर यांच्या पुराव्यात असे आले आहे की, घटना सायंकाळी ४.०० वाजता घडली होती. त्यावेळी ते मंगरुळपीर येथे जात असतांना डि.पी. जवळ त्यांना तार पडलेला दिसला व लोक जमा झालेले दिसले. त्यांनी तेथे जावुन पाहिले असता विजेचा मुख्य तार तुटल्यामुळे एका मुलीच्या अंगावर तार पडला होता व दुसरी मुलगी तिला धरण्यासाठी गेली असता त्या दोघी जळाल्या होत्या. उपचारादरम्यान दोन्ही मुलींचा मृत्यु झाला. त्यांच्या पुराव्यात पुढे असे आले आहे की, घटना ही विजेच्या तारेमुळे घडली होती. त्यांनी टि—गार्ड बसविण्यासाठी दोन ते तिन वेळा आरोपींच्या कार्यालयात सांगितले होते, परंतु टि—गार्ड न बसविल्यामुळे अपघात झाला होता.

**१२.** साक्षीदार क्र. ०७ सुनिल हे मयत श्रेया हिचे वडील आहेत.

त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, घटना दिनांक १५/११/२०१८ रोजी सायंकाळी ४.३० ते ५.०० वाजता गावाच्या बाजुला डि.पी. जवळ घडली होती. त्यावेळी श्रेया, ज्ञानेश्वरी व गोपी या संडासला गेल्या होत्या. त्यांच्या पुतण्याचा गोठा संडासच्या बाजुलाच आहे. त्यांना डि.पी. जवळ लोकांचा आवाज आल्यामुळे ते त्याठिकाणी गेले असता ज्ञानेश्वरी हिच्या अंगावर विजेचा तार पडलेला होता व श्रेया ही तार काढण्यासाठी गेली असता तिचा संपुर्ण हात जळाला होता. त्यावेळी लहान मुलगी गोपी ही अगोदरच घराकडे आली होती. त्यानंतर त्यांनी तार काढुन मुलींना दवाखान्यात नेले. उपचारादरम्यान त्या दोघींचा मृत्यु झाला. सदरची घटना ही विजेच्या ताराला गार्ड नसल्यामुळे झाली होती. साक्षीदार क्र. ०८ अनिता या मयत श्रेया हिच्या आई आहेत. त्यांनी त्यांच्या पुराव्यात साक्षीदार क्र. ०७ यांच्या कथनाप्रमाणेच कथन केलेले आहे.

**१३.** साक्षीदार क्र. ०९ शुभम याच्या पुराव्यात असे आले आहे की, घटना दिनांक १५/११/२०१८ रोजी सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास घडली होती. त्यावेळी तो व भास्कर कोहचळे असे शाळेजवळ बसले असतांना विजेच्या डि.पी. जवळ आवाज आल्यामुळे लोक तिकडे धावत होते व ते देखील तिकडे गेले. त्यावेळी मयत ज्ञानेश्वरी हिच्या अंगावर तार पडलेला होता व मयत श्रेया हिने तो तार उचलण्यासाठी पकडला होता. त्यानंतर गावातील लोकांनी तो तार बाजुला काढला आणि त्या दोघींना सरकारी दवाखान्यात नेले. उपचारादरम्यान त्या दोघींचा मृत्यु झाला.

**१४.** फिर्यादी मनोज भोयर यांचे निधन झालेले असल्यामुळे त्यांना न्यायालयासमक्ष तपासण्याची संधी अभियोगपक्षास मिळाली नाही. तसेच वेळोवेळी संधी देवुनही अभियोगपक्षातर्फे गुन्हा नोंद करणारे पोलिस कर्मचारी यांना तपासण्यात आलेले नाही. त्यामुळे फिर्याद व त्यातील मजकुर सिध्द होवु शकला नाही. निश्चितच फिर्याद ही महत्वाचा पुरावा नाही. फिर्याद ही केवळ घडलेल्या घटनेबाबत पोलिस ठाण्यात दिलेली माहिती असते. त्यामुळे केवळ फिर्याद सिध्द केली नाही या कारणावरुन अभियोगपक्षाचे कथन

नाकारता येणार नाही, परंतु त्याकरिता अभिलेखावर आलेला इतर पुरावा पाहणे गरजेचे आहे. तसेच सदर पुरावा हा आरोपींनी विवीक्षीत गुन्हे केल्याचे सिध्द करण्याइतपत पुरेसा असणे आणि विश्वासार्ह असणे गरजेचे आहे.

**१५.** साक्षीदार क्र.११ तपासिक अंमलदार यांच्या पुराव्यात असे आले आहे की, मयत श्रेया ही अकोला येथे उपचाराकरीता दवाखान्यात भरती असल्यामुळे दिनांक १६.११.२०१८ रोजी त्यांनी वैद्यकीय अधिकारी यांना पत्र दिले. त्या पत्रावरून (निशाणी ६६) वैद्यकीय अधिकारी यांनी मयत श्रेया हीचा जबाब नोंदवण्यास परवानगी दिल्याचे आणि बयाण देण्यास ती सक्षम असल्याचे दिसुन येते. मयत श्रेया हीचे तपासादरम्यान दवाखान्यात नोंदवलेले बयाण निशाणी ६७ कडे आहे. त्याचे अवलोकन केले असता ती, मयत ज्ञानेश्वरी व गोपी या संडासला गेल्या होत्या आणि परत येत असताना गोपी पुढे गेली. त्यावेळी डि.पी.जवळ ज्ञानेश्वरी हीच्या अंगावर विजेचा तार पडल्याचे व तो तार तिने ओढून काढला असता तिला देखील करंट लागल्याचे ती सांगते.

**१६.** याठिकाणी सर्वप्रथम नमुद करावे लागेल की, आरोपींतर्फे मयत श्रेया सुनिल भोयर व ज्ञानेश्वरी मनोज भोयर यांचे शवविच्छेदन अहवाल व मरणोत्तर पंचनामा इत्यादी कागदपत्रे मान्य करण्यात आले आहेत. त्यावरुन मयत श्रेया व ज्ञानेश्वरी या भाजल्यामुळे त्यांचा मृत्यु झाल्याचे दिसुन येते. सदरची बाब आरोपींनी नाकारलेली नाही. त्यामुळे मयत श्रेया व ज्ञानेश्वरी यांचा मृत्यु हा विजेचा तार तुटुन त्यांच्या अंगावर पडल्यामुळे आणि त्यामुळे भाजुन त्यांचा मृत्यु झाल्याचे दिसुन येते. तसेच हे देखील नमुद करावे लागेल की, विजेचा तार तुटून तो मयत ज्ञानेश्वरी व श्रेया यांच्या अंगावर पडल्याचे आरोपींनी साक्षीदारांच्या उलटतपासादरम्यान नाकारलेले नाही. केवळ सदरचा तार हा त्यांच्या निष्काळजीपणामुळे तुटला नव्हता असे आरोपींचे कथन असल्याचे त्यांच्यातर्फे अभियोगपक्षाच्या साक्षीदारांना विचारण्यात आलेल्या प्रश्नांवरून दिसुन येते. आता सदर विजेचा तार हा आरोपींच्या हलगर्जीपणामुळे व निष्काळजीपणामुळे तुटला होता किंवा कसे हे पाहावे लागेल.

**१७.** तपासादरम्यान तपास अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपणी मंगरूळपीर यांना पत्र लिहून मौजे शेलगाव रूलर सेक्टर क्र.१ खेडे विभाग ०१ येथील लाईनमन, सहाय्यक अभियंता व उपकार्यकारी अभियंता यांचे नाव व पत्ता मिळण्याची विनंती केली होती. त्या पत्रावरून उपकार्यकारी अभियंता यांनी निशाणी ७३ प्रमाणे माहिती दिल्याचे दिसुन येते. त्याअन्वये घटनेच्या वेळी आरोपी क्र.२ हे विज वितरण केंद्र ग्रामीण भाग ०१ मंगरूळपीर येथे तंत्रज्ञ म्हणून कार्यरत असल्याचे दिसुन येते. तसेच त्यावेळी सहाय्य अभियंता म्हणून कु. पुनम काळे या होत्या, परंतु त्या प्रसुती रजेवर असल्यामुळे त्यांचा अतिरीक्त पदभार मंगरूळपीर शहरचे सहाय्यक अभियंता श्री. व्ही. डी. राठोड यांच्याकडे होता असे नमुद आहे. त्याचप्रमाणे श्री. व्ही. डी. राठोड यांनी दिनांक २६.१०.२०१८ रोजी पासुन ऑनलाईन वैदयकीय रजेचा अर्ज करून ते कर्तव्यावर हजर नाही असे नमुद केलेले आहे. तसेच त्यावेळी आरोपी क्र.१ हे उपकार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत असल्याचे कळविले आहे. सदरचे पत्र आरोपींनी मान्य केलेले असल्यामुळे घटनेच्या वेळी आरोपी क्र.१ हे उपकार्यकारी अभियंता व आरोपी क्र.२ हे तंत्रज्ञ म्हणून कार्यरत असल्याचे विवादित नाही.

**१८.** अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे घटना ही शेलगांव गावातील गावठाणामध्ये घडली होती. त्यामुळे सर्वप्रथम घटनास्थळ पाहणे गरजेचे आहे. साक्षीदार क्र.१ व ३ यांना घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार म्हणून तपासण्यात आले आहे. साक्षीदार क्र.१ यांनी अभियोगपक्षास समर्थन केले नाही. साक्षीदार क्र.३ यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक १६.११.२०१८ रोजी पोलीसांनी त्यांना पंचनामा करण्याकामी बोलावले होते. ज्याठिकाणी पंचनामा करण्याकरीता ते गेले होते, त्या ठिकाणी मुली जळाल्या होत्या व ती जागा जळालेली होती. त्याठिकाणी जळालेले कपडे होते व काही वस्तू होत्या. पोलीसांनी त्या वस्तू जप्त केल्या. पोलीसांनी तसा पंचनामा केला.

**१९.** साक्षीदार क्र.११ तपासिक अंमलदार यांच्या पुराव्यात असे आले

आहे की, दिनांक १६.११.२०१८ रोजी नरेश भोयर यांनी दिलेल्या अर्जावरून ते व त्याचे सहकारी महादेव सोळंके असे घटनास्थळी गेले होते. त्या ठिकाणी त्यांनी दोन पंचांना बोलावून त्यांच्या समक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला. सदरचे घटनास्थळ शेलगांव गावठाण जवळील होते. त्याठिकाणी इलेक्ट्रीक डी.पी.ला जोडणारा मुख्य तार तुटून पडलेला होता. तसेच त्याठिकाणी कपडयाचे तुकडे जळालेल्या स्थितीत होते व तेथील गवत जळालेले होते. त्यांनी त्याठिकाणी पंचनामा केला.

**२०.** साक्षीदार क्र.३ व साक्षीदार क्र.११ यांच्या उलटतपासात घटनास्थळ पंचनाम्याबाबत त्यांनी केलेल्या कथनाविपरीत कोणतेही कथन आलेले नाही. निशाणी २९ कडील घटनास्थळ पंचनाम्याचे अवलोकन केले असता सदरचे घटनास्थळ हे शेलगाव गावाच्या दक्षिणेस गावठाण जमिनीवरील असल्याचे दिसुन येते. तसेच त्याठिकाणी इलेक्ट्रीक डि.पी. असुन त्या डि.पी. वरून पॉवरहाउस मंगरूळपीर ते वाशिम रोडकडे गेलेल्या विजेच्या तारा आहेत. तसेच त्या डि.पी. वरून गावामध्ये गेलेल्या विजेच्या तारा असल्याचे दिसून येते. यापुर्वीच नमुद केल्याप्रमाणे आरोपींना घटना घडल्याचे मान्य असल्याचे दिसुन येते. तसेच घ टनेमध्ये डि.पी.वरील विजेचा तार तुटून तो मयत ज्ञानेश्वरी व श्रेया यांच्या अंगावर पडल्याचे आणि त्यामध्ये त्यांचा मृत्यू झाल्याचे त्यांना मान्य आहे. आता हे पहावे लागेल की, सदर घटना आरोपींच्या अथवा विज वितरण कंपणीच्या हलगर्जीपणामुळे अथवा निष्काळजीपणामुळे झाली होती काय.

**२१.** घटनेपूर्वी मयत श्रेया व ज्ञानेश्वरी या जनावरांच्या गोठयावर गेल्या होत्या. ही बाब विवादीत नाही. मनोज भोयर व नरेश भोयर यांच्या जनावरांचे गोठे हे गावठाण जमिनीवर असल्याचे साक्षीदारांनी मान्य केलेले आहे. तसेच त्या गोठयावर विज मीटर नसल्याचे देखील साक्षीदार मान्य करतात. आरोपींचा असा बचाव आहे की, मयत श्रेया व ज्ञानेश्वरी या गोठयाच्या बाजूने गेलेल्या विजेच्या तारेवर आकोडे टाकत असताना तार तुटले व त्यांच्या अंगावर पडले. सदरची बाब साक्षीदारांनी नाकारलेली नाही. घटनेच्या वेळी मयत श्रेया व

ज्ञानेश्वरी या आकोडे टाकत असल्याबाबत कोणताही पुरावा आलेला नाही. त्याबाबत आरोपींतर्फे तपासिक अंमलदार यांना कोणतेही प्रश्न विचारण्यात आले नाहीत. त्यामुळे आरोपींचा सदरचा बचाव सबळ असल्याचे दिसुन येत नाही.

**२२.** साक्षीदार क्र.२ सुशिला यांनी असे मान्य केले आहे की, नकसान भरपाई मिळण्यायकरीता त्यांच्या पतीने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडे अर्ज केला होता व वारंवार नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केली होती. तसेच सदर नुकसान भरपाईचा प्रस्ताव लवकर मंजूर न झाल्यामुळे त्यांच्या पतीने फिर्याद दाखल केल्याचे त्या मान्य करतात. असे असले तरी, त्यावरून दिलेली फिर्याद खोटी आहे असे मानता येणार नाही. जर घटनेमध्ये आरोपींचा निष्काळजीपणा अथवा हलगर्जीपणा शाबीत झाल्यास केवळ नुकसान भरपाई लवकर मिळाली नाही या कारणामुळे फिर्याद दाखल केली असा बचाव समर्थनीय ठरणार नाही.

**२३.** साक्षीदार क्र.२ सुशिला, साक्षीदार क्र.४ नरेश व साक्षीदार क्र.५ निलेश यांनी त्यांच्या तोंडी पुराव्यात घटना ही आरोपींच्या अथवा विज वितरण कंपणीच्या निष्काळजीपणामुळे अथवा हलगर्जीपणामुळे घडल्याचे कोणतेही कथन केलेले नाही. साक्षीदार क्र.७ सुनिल याने विजेच्या तारांना गार्ड नसल्यामुळे घ टना घडल्याचे त्यांच्या सरतपासात कथन केलेले असले तरी सदरचा मजकूर पोलीसांनी त्यांच्या नोंदवलेल्या जबाबामध्ये नमुद नाही. याचाच अर्थ, सदरची बाब साक्षीदार क्र.७ हा न्यायालयासमोर प्रथमच कथन करीत आहे. त्यामुळे साक्षीदार क्र.७ याचे कथन कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय विचारात घेता येणार नाही.

**२४.** साक्षीदारांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, विजेच्या तारेवर वारंवार स्पार्कींग होत असल्यामुळे त्यांनी गार्ड बसविण्यास आरोपींच्या कार्यालयात सांगितले होते. असे असले तरी, असे कोणतेही तक्रारी अर्ज तपासादरम्यान हस्तगत करण्यात आलेले नाहीत. त्याचप्रमाणे तशी तक्रार

गावातील लोकांनी केली होती किंवा कसे याबाबत तपासादरम्यान कोणतीही चौकशी केली नसल्याचे साक्षीदार क्र.११ तपास अधिकारी सांगतात. सदर घटना घडलेली असताना आणि सदरची घटना आरोपी अथवा विज वितरण कंपणी यांच्या चुकीमुळे घडल्याचे साक्षीदार कथन करत असताना तपास अधिकारी यांनी विद्युत वाहिणीबाबत गावातील लोकांनी तक्रारी दिल्या होत्या किंवा कसे याबाबत तपास करणे गरजेचे होते. त्याबाबत कोणताही पुरावा आला नसल्यामुळे अभियोगपक्षाच्या कथनांबाबत संशय निर्माण होतो.

२५. त्याचप्रमाणे घटना नेमकी कशामुळे घडली याबाबत तज्ञांचा अहवाल घेणे आवश्यक असताना त्यांनी तज्ञांचा कोणताही अहवाल घेतला नसल्याचे तपास अधिकारी यांनी उलटतपासात मान्य केले आहे. त्यामुळे घटना ही नेमकी कशामुळे घडली याबाबत निश्चित बाब अभिलेखावर आलेली नाही. त्यामुळे देखील अभियोगपक्षाच्या कथनांबाबत संशय निर्माण होतो.

२६. घटनास्थळावरून एक विजेच्या तारेचा तुकडा जप्त केल्याचे अभियोगपक्षाचे कथन आहे. साक्षीदार क्र.३ व साक्षीदार क्र.११ तपास अधिकारी यांच्या पुराव्यावरून सदर तुकडा घटनास्थळावरून जप्त केल्याचे दिसुन येते. घटनेच्या वेळी घटनास्थळावर जो तार पडलेला होता. तो काळपट झाला होता असे साक्षीदारांच्या पुराव्यात आलेले आहे. परंतु जप्त करण्यात आलेल्या विजेच्या तारेच्या तुकडयावर जळाल्याची कोणतीही खूण नसल्याचे तपास अधिकारी यांनी मान्य केलेले आहे. त्यामुळे त्या जप्त केलेल्या ताराबाबत देखील संशय निर्माण होतो.

२७. निश्चितच घटनेच्या वेळी आरोपी हे वरिष्ठ तंत्रज्ञ व उपकार्यकारी अभियंता म्हणून नोकरीस होते. याचाच अर्थ ते लोकसेवक होते. त्यांनी लोकसेवक म्हणून कार्य करताना त्यांच्या कामात हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्याचे अभियोगपक्षाचे कथन आहे. अशा परिस्थितीत, आरोपींविरूद्ध अपराधाची दखल घेण्यापूर्वी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १९७ अन्वये

आरोपींच्या वरिष्ठांचे अथवा ज्या सरकारच्या अखत्यारीत ते काम करतात. त्यांची मंजुरी घेणे गरजेचे आहे. प्रस्तुत प्रकरणात दोषारोप दाखल करण्यापुर्वी अथवा दाखल केल्यानंतर अशी मंजुरी घेण्यात आल्याचे दिसुन येत नाही. तसेच तशी मंजुरी मिळण्याकरीता तपास अधिकारी यांनी कोणतेही प्रयत्न केल्याचे देखील दिसुन येत नाही. यामुळे या न्यायालयाला आरोपींविरूद्ध अपराधाची दखल घेण्याचा किंबहुणा अधिकार राहत नाही.

**२८.** यापुर्वीच नमुद केल्याप्रमाणे आरोपींवरूद्ध दोषारोपीत केलेले गुन्हे सर्व शंकेपलीकडे सिद्ध करण्याची जबाबदारी अभियोगपक्षाची आहे. आरोपींनी त्यांच्या कामामध्ये काय हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केला याबाबत कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर आलेला नाही. घटनेचा कोणताही प्रत्य क्षदर्शी साक्षीदार नाही. घटनेच्यापूर्वी डि.पी.वरील विजेच्या तारेवर स्पार्कींग होत होती याबाबत पुरावा आलेला नाही. तसेच गावातील लोकांनी स्पार्कींग होत असल्यामुळे गार्ड बसविण्यास आरोपींच्या कार्यालयात सांगितले होते व त्याबाबत तक्रारी केल्या होत्या असा देखील कोणताही पुरावा आलेला नाही. त्यामुळे एकंदरीत आलेला पुरावा हा आरोपींवरील दोषारोप सर्वशंकेपलीकडे सिद्ध करण्याइतपत पुरेसा ठरत नाही. त्यामुळे मी मुद्दे क्रमांक ०१ ते ०३ चा निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ०४ बाबत</u>**

**२९.** मुद्दा क्रमांक ०१ ते ०३ वरील निष्कर्षांमुळे आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहेत.

**३०.** फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ चे कलम ४३७—अ अन्वये या न्यायनिर्णयाविरुध्द करण्यात आलेल्या अपील किंवा ईतर कार्यवाहीत हजर राहण्याची हमी म्हणून आरोपींना जामीन देण्याकरीता आदेशीत करणे आवश्यक आहे. सबब आदेश—

## आदेश

१. फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये आरोपींना भा.दं.वि. चे कलम ३३७, ३३८, ३०४–अ अन्वये शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचा पुर्वीचा जामीन कद्बा रद्द करण्यात येते.

३. फौजदारी प्रकिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये आरोपींनी प्रत्येकी रक्कम रूपये ५०००/– चा जात मुचलका व जामीन कद्बा दयावा. आरोपींनी दिलेला जात मुचलका व जामीन कद्बा आज पासून पुढे सहा महिन्यांपर्यंत परिणामकारक असेल.

४ ज्पत मुद्देमाल जळालेल्या कपड्याचे तुकडे व विजेच्या तारेचा तुकडा मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर विल्हेवाटीत करावे. परंतु या न्यायनिर्णयाविरुद्ध अपील केले असल्यास त्यातील आदेशाप्रमाणे विल्हेवाटीत करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

SUBHASH DATTARAO TARE

Digitally signed by SUBHASH DATTARAO TARE
Date: 2026.03.20 18:02:56 +0530

दिनांक :– १६.०३.२०२६

(सुभाष द. तारे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंगरुळपीर

| CERTIFICATE | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order. | | |
| Name of Court | :- | 2nd Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Mangrulpir, Dist. Washim. |
| Presiding Officer | :- | Subhash D. Tare |
| Order uploaded by | :- | Shri. S. S. Rathod (Jr. Clerk) |
| Date of Order | :- | 16/03/2026 |
| Judgment/Order signed by the presiding officer on | :- | 16/03/2026 |
| Judgment/Order uploaded on | :- | 20/03/2026 |